**नियमित दि.दावा क्र.११७/२०१२**
**सी.एन.आर.क्र.एमएचएएच२२०००३६०२०१२**
बाजीराव बाबुराव वि. नंदकुमार आबा

## आदेश निशाणी ६४ खालील
(पारीत दिनांक २०/०७/२०१८)

वादीने प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र.२ ते ५ व ८ यांच्याविरूध्द दिनांक ०१/०७/२०१७ रोजी झालेला दावा रद्दचा आदेश रद्द होवून त्यांच्याविरूध्द समन्स काढण्याचा हुकूम व्हावा अशी विनंती केली आहे.

२) वादीच्या कथनाप्रमाणे प्रस्तुत दावा वाटप व जाहीर ठरावासाठी दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.१ मयत असून वादी मयत झाला आहे. वादीने अर्ज देवून प्रतिवादी क्र.१ व वादीचे वारस रेकॉर्डवर घेतले आहेत. प्रतिवादी क्र.२ ते ४ यांच्या नावात व राहण्याचे पत्ते यामध्ये (नि.६०) प्रमाणे दुरूस्ती केलेली आहे. वादींनी प्रतिवादींना समन्स बजावणीसाठी वेळोवेळी पुर्तता केलेली आहे. मात्र, प्रतिवादींचे समन्स बजावून येवू शकले नाही. समन्स लखोटा हाती घेवून शिरूर, जि.पुणे या कोर्टात दिला होता. तसेच रजिस्टर पोस्टाने ही समन्स काढले होते. त्यानंतर (नि.६०) प्रमाणे प्रतिवादींचे नावात दुरूस्ती केली आहे. त्याप्रमाणे प्रतिवादींना समन्स काढलेले नाहीत. (नि.६०) प्रमाणे केलेल्या दुरूस्तीनंतर समन्स काढणे आवश्यक आहे. सबब, प्रतिवादी क्र.२ ते ५ व ८ विरूध्द दिनांक ०१/०७/२०१७ रोजी केलेला दावा रद्दचा हुकूम नामंजूर होणे आवश्यक आहे. सदर प्रतिवादी आवश्यक पक्षकार आहेत. त्यांना बजावणी झाल्याशिवाय वादीचा दावा कायद्याने मंजूर होवू शकणार नाही त्यामुळे सदर आदेश रद्द व्हावा. आदेश रद्द झाल्यास प्रतिवादींचे नुकसान अगर गैरसोय होणार नाही. याउलट आदेश रद्द न झाल्यास वादींचा कायदेशीर हक्क नष्ट होवून त्यांचे नुकसान होणार आहे. सबब, अर्ज मंजूर करावा अशी विनंती केली.

३) प्रतिवादी क्र.६, ९, १० व ११ यांनी अर्जास आक्षेप घेवून अर्ज चुकीचा व बेकायदेशीर असून वादीने जाणीवपूर्वक दाव्याचे कामकाज लांबणीवर टाकण्यासाठी योग्य वेळी योग्य पुर्तता केलेली नाही. वादीचा अर्ज रद्द करण्यात यावा. दिनांक ०१/०७/२०१७ चे आदेशाविरूध्द वादीने वरिष्ठ न्यायालयात दाद मागणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्ज कायद्याने चालण्यास पात्र नाही असे कथन केले.

४) वादीतर्फे विधिज्ञ श्री.शेळके यांचा युक्तिवाद ऐकला. त्यांच्या कथनाप्रमाणे वादीने आवश्यक पुर्तता केली आहे. त्यापूर्वी वादीने हाती लखोटा घेवून शिरूर कोर्टात दिला होता. रजिस्टर पोस्टाने समन्स पाठवले होते. (नि.६०) चे आदेशाप्रमाणे दावेत दुरूस्ती केली, दुरूस्तीप्रमाणे समन्स काढणे आवश्यक आहे. प्रतिवादी आवश्यक पक्षकार आहेत. अर्ज नामंजूर झाल्यास वादीचे नुकसान होणार आहे. त्यामुळे अर्ज कॉस्टवर मंजूर करण्यात यावा. त्यापुष्टयर्थ त्यांनी मा.मुंबई उच्च न्यायालयाचा जयराम अनंत मांढरेकर वि. श्रीमती अर्जुन घाटवल, २०१२ (४) एम.एच.एल.जे. ४८० व जैबुनिस्सा वि. ऋषी मुन, २०११ (१) ऑल एम.आर. १६० या निवाडयांचा आधार घेतला.

५) प्रतिवादीतर्फे विधिज्ञ श्री.एस.बी.शिंदे यांचा युक्तिवाद ऐकला. वादीने योग्य वेळी योग्य पुर्तता केली नाही, दावा सहा वर्षापेक्षा जुना असून वादीने पुर्तता केली नसल्यानेच तो प्रलंबित आहे. उशीराबाबत कोणतेही संयुक्तिक कारण दिले नाही. पुर्तता करण्यास उशीर झाल्यामुळेच न्यायालयाने आदेश पारीत केला आहे. वादी पुर्तता करण्याच्या मन:स्थितीत नाही. तीन वर्षापेक्षा जास्त उशीर झाला आहे त्यामुळे अर्ज खर्चासह नामंजूर करावा असा युक्तिवाद केला.

६) प्रस्तुत दावा दिनांक २५/०४/२०१२ रोजी दाखल केला आहे. अद्याप प्रतिवादी क्र.२ ते ५ व ८ यांना दाव्याचे समन्स बजावलेले नाही. वादीने दावा दाखल केल्यानंतर प्रतिवादी क्र.१ व वादी मयत झाला आहे. प्रतिवादी क्र.१ दिनांक २०/०८/२०१२ रोजी मयत झाला. त्याचे वारस (नि.३७) प्रमाणे रेकॉर्डवर घेणेबाबत अर्ज केला. त्यानंतर वादीने (नि.४०) प्रमाणे प्रतिवादी क्र.२ ते ५ यांना रजिस्टर पोस्टाने समन्स काढण्यासाठी दिनांक ०८/११/२०१२ रोजी अर्ज केला. दिनांक १७/०१/२०१३ रोजी प्रतिवादी क्र.४, ३, २ हे दिलेल्या पत्यावर राहत नाहीत असा शेरा मारून समन्स न बजावता परत आले. प्रतिवादी क्र.५ चे ही समन्स सदर नावाचा इसम पिंपरी बु. येथे राहत नाही असा शेरा मारून परत आले. त्यानंतर प्रतिवादींनी (नि.५०) वर अर्ज देवून समन्स काढण्याबाबत विनंती केली. परंतू समन्स बजावणी झाली नाही. त्यानंतर पुन्हा समन्स पाठवले. प्रतिवादी क्र.२ चा पत्ता अपुर्ण, प्रतिवादी क्र.८ चा पत्ता अपुर्ण याकारणास्तव समन्स न बजावता परत आले. त्यानंतर वादीने दिनांक २१/०२/२०१५ पासून प्रतिवादींविरूध्द समन्स काढण्याबाबत पुर्तता केली नाही. दरम्यान वादीचे वारस रेकॉर्डवर घेतले. दिनांक ०५/१०/२०१५ रोजी (नि.६०) वर अर्ज देवून प्रतिवादी क्र.२, ३, ४ चे नाव आणि पत्ते ही बदलले. सदर अर्ज दिनांक ११/०७/२०१६ रोजी मंजूर झाला. वादींनी दुरूस्त दाव्याची प्रत दाखल केली. तथापि, त्यानंतर प्रतिवादी क्र.२ ते ५ व ८ यांना समन्स पाठवण्यासाठी कोणतीही पुर्तता केली नाही. वादीने तबल २ वर्ष प्रतिवादी क्र.२ ते ५ व ८ यांच्याविरूध्द समन्स पाठवण्यासाठी कोणतीही तजवीज केली नाही. दावा पाच वर्षाहून जुना असल्याने व पुर्तता न केल्याने दिनांक ०१/०७/२०१७ रोजी प्रतिवादी क्र.२ ते ५ व ८ विरूध्द दावा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ९ नियम ५ प्रमाणे खारीज केला. त्यानंतर वादीने प्रस्तुत अर्ज तीन महिन्याने दाखल केला आहे.

७) वादीच्या कथनाप्रमाणे त्याने दावा दुरूस्त होण्यापूर्वी प्रतिवादींना समन्स बजावणीसाठी वेळोवेळी आवश्यक ती पुर्तता केली आहे. तथापि, मुळ दाव्यातच वाादींनी चुकीची नावे व पत्ते दिल्याने तबल तीन वर्ष चुकीच्या तजवीजीच्या आधारे प्रतिवादी क्र.२ ते ४ यांच्याविरूध्द समन्स काढण्याची वेळी आली. वादीने त्यानंतर दाव्यात दुरूस्ती करून प्रतिवादी क्र.२ ते ४ यांची नावे व पत्ते बदलले आहेत. प्रतिवादी क्र.२ ते ५ व ८ यांच्याविरूध्द समन्स काढण्यासाठी समन्स न बजावता परत आल्यापासून दोन महिन्यात पुर्तता करणे आवश्यक होते. परंतू तब्बल तीन वर्षापर्यंत वादीने आवश्यक पुर्तता केलेली नाही. त्यास पत्ता शोधण्यास विलंब झाला अगर प्रतिवादी जाणीवपुर्वक समन्स बजावणी करून घेत नाही अगर अन्य संयुक्तिक कारणामुळे समन्स बजावणीबाबत पुर्तता करता आली नाही असे वादीचे कथन नाही. दावा तब्बल सहा वर्षापासून समन्स बजावणीसाठीच प्रलंबित आहे. दावा वाटपाचा आहे त्यामुळे प्रतिवादी प्रस्तुत दाव्याचे कामी आवश्यक पक्षकार आहेत ही बाब वादीला पुर्वी पासुनच माहित होती. तथापि, वादींनी त्याअनुषंगाने पुर्तता केली नाही.

८) (नि.६०) वरील आदेश दिनांक ११/०७/२०१६ रोजी झाला आहे. वादीने १४ दिवसांत दाव्यात दुरूस्ती करून दुरूस्तप्रत पटलावर दाखल करणे आवश्यक होते. तथापि, वादीने दिनांक २१/०१/२०१७ रोजी दुरूस्त दाव्याची प्रत दाखल केली आहे. सदर प्रत दाखल करण्यास ही विलंब लावला आहे. त्यानंतर प्रतिवादी क्र.२ ते ५ व ८ यांना नवीन पत्त्यावर समन्स काढण्यासाठी अर्ज केला नाही. म्हणजेच वादीने कोणतीही पुर्तता करण्यास टाळाटाळ केली आहे.

९) वादीने दाखल केलेले निवाडे पाहता त्यात मा.उच्च न्यायालयाने परिच्छेद ६ व ७ मध्ये वादीचे विधिज्ञ व वादी गैरहजर त्यामुळे पुर्तता केली नाही म्हणून न्यायालयाने दावा प्रतिवादींविरूध्द खारीज केला. तथापि, वादीतर्फे विधिज्ञांनी तारीख घेण्यात तफावत झाल्याने नेमलेल्या तारखेदिवशी पुर्तता केली नाही असे कारण देवून अर्ज दिला. त्याने संयुक्तिक कारण दिल्याचे नमुद करून मा.उच्च न्यायालयाने प्रतिवादींविरूध्द पुन्हा दावा फेर फैलावर घेण्यात यावा असा आदेश पारीत करताना वादीला ५०००/- रूपये कॉस्ट केली आहे. तथापि, प्रस्तुत दाव्यातील वाद तथ्ये पाहता मुळात वादीने प्रतिवादी क्र.२ ते ५ विरूध्द चुकीच्या नावाने व चुकीच्या पत्त्यावरच दावा दाखल केला. (नि.६०) प्रमाणे दुरूस्ती करूनही आवश्यक पुर्तता केली नाही. तबल ५ वर्षाच्या कालावधीत दाव्यात प्रतिवादी क्र.२ ते ५ व ८ यांना समन्सची बजावणी ही झाली नाही. पटलावरील अर्ज पाहता वादींनी दिलेली कारणे संयुक्तिक वाटतात. याशिवाय दावेचे स्वरूप पाहता प्रस्तुत निवाडयातील तत्वे वादीस उपयुक्त आहेत असा निष्कर्ष निघतो.

१०) वादींनी ***<u>जैबुनिस्सा वि. ऋषीमुन २०११ (१) ऑल एम. आर. १६०</u>*** या निवाडयाचा आधार घेवून न्यायालयीन प्रक्रियेत तंतोतंत लागू न करता त्यास बाजु मांडण्याची संधी दयावी. प्रस्तुत दावा वाटपासाठी आहे. इतर प्रतिवादींनी हजर होवून कैफियत दिली आहे. त्यामुळे पुन्हा वादीला या प्रतिवादींविरूध्द दावा दाखल करून दाद मागणे भाग पडणार आहे तसे झाल्यास एकाच मिळकतीबाबत एकाच पक्षकारांमध्ये वेगवेगळे दावे करून वेगवेगळे आदेश होण्याची शक्यता नाकारता येत नाही. दाव्यांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी एकाच दाव्यात वादी, प्रतिवादींमधील वाद संपुष्टात येणे आवश्यक वाटते. तथापि, पुर्तता करण्यास झालेला विलंब पाहता त्यामुळे प्रतिवादींना न्याय मिळण्यास

विलंब होत आहे. त्यामुळे वादीकडुन नुकसान भरपाई घेणे आवश्यक वाटते. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१) वादीने प्रतिवादींना रक्कम रूपये ५०००/-(अक्षरी पाच हजार रूपये मात्र) खर्च देण्याच्या अटीवर अर्ज मंजूर केला.

२) वादींनी पुढील तारखेस अगर पूर्वी खर्चाची रक्कम देवून प्रतिवादी क्र.२ ते ५ व ८ यांच्याविरूध्द समन्स काढण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करावी. तसे न केल्यास प्रस्तुत आदेश रद्द समजण्यात यावा.

सही/-
दिनांक :२०/०७/२०१८ (ध.ज. पाटील)
कर्जत. दिवाणी न्यायाधीश क.स्तर, कर्जत.